# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६८९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/१०/२०१६

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन घरात प्रवेश करुन काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/१०/२०१६ रोजी ०८.३० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या पतीसह घरी हजर असतांना यातील पाचही आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन हातात लाठया काठया घेवुन फिर्यादीचे घरात आत प्रवेश करुन त्यांना आमचे म्हणन्या प्रमाणे तुम्ही वागा नाही तर येथुन निघुन जा असे बोलुन काठीने फिर्यादीचे डोक्यावर, कमरेला मारुन जखमी केले व फिर्यादीचे पती, दिर यांना मारहान करुन फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५२,१४७,१४८,१४९,३२४,३२३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. वानखेडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) गैरकायदयाची मंडळी जमवुन काठीने मारहान केली व बंदुकीने ठार मारण्याची धमकी दिली. . :–**

दिनांक १९/१०/२०१६ रोजी ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी मोहीत मुन्नालाल राठोड वय १८ वर्ष, रा. बिरसा मुंडा चौक सेंदुरवाफा व त्याची बहीन कु. सोनम हे दोघेही घराच्या खुल्या अंगणात दात घासत असतांना यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन हातात काठया घेवुन फिर्यादीचे घराचे खुल्या अंगणात फिर्यादीचे बहीनी जवळ येवुन आरोपी क्र. १ ने हात पकडुन जबरदस्तीने लग्न करण्यासाठी नेत असतांना फिर्यादी व त्याची बहीन, वडील, काका, काकु यांनी विरोध केला असता त्यांना आरोपीतांनी मारहान करुन फिर्यादीस डोक्यावर मारुन गंभिर जखमी केल्याने फिर्यादीचे बहीनीस बंदुकीने ठार मारण्याची धमकी दिली असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १४६,१४७,१४८,१४९,४४८,३२६,३२४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. वानखेडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) खंडणीची मागणी करुन मारहान व शिविगाळ केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/१०/२०१६ रोजी २१.३० वा. दर. यातील फिर्यादी हा आपल्या किराणा दुकानात हजर असतांना यातील आरोपीने फिर्यादीचे दुकानात जावुन आत प्रवेश करुन खंडणीची (पैशाची) मागणी केली असता फिर्यादीने नकार दिल्याने त्याचे सोबत तोंडा तोंडी भांडण, शिविगाळ करुन हाताबुक्यांनी मारहान करुन व फिर्यादीचा भाऊ विक्रांत याचे उजवे हातावर काठीने मारुन दुखापत करुन फिर्यादीचे व त्यांचे कुंटुबातील लोकांना व मामा चरण वाघमारे यांना जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी निशांत राधेशाम देशमुख वय ३१ वर्ष, रा. शिवाजी नगर तुमसर यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३८७,३२३,४५२,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

४) अवैध दारु अडयांवर धाडी . :–

दिनांक १९/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, कारधा व करडी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ४८ लिटर हातभटटी दारु कि. ३,०५०/–रू. तसेच ४२५ मिली लिटर व विदेशी +मोटार सायकल कि. ३९,३४०/रु. चा माल माल जप्त असा एकुण कि. ४२,३९०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.